गोपनीय
अतितात्काळ

विषय :- नवीन देशी मद्य किरकोळ विक्री अनुज्ञप्त्या (नमुना सी. एल. ३) मंजूर करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे.

महाराष्ट्र शासन, गृह विभाग,
परिपत्रक क्र. सीएलआर. १०८९/ ३८९/२३/पीआरओ-३,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक २२ फेब्रुवारी १९८९.

प रि प त्र क

गेल्या काही वर्षांपासून शासन नवीन देशी मद्य किरकोळ विक्री अनुज्ञप्त्या (नमुना सी. एल. ३) मंजूर करीत नाही याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना आहेच. या धोरणाचा परिणाम म्हणून तलेच कालऔघात देशी मद्य किरकोळ विक्रीची अधिकृत दुकाने राज्याच्या सर्व भागात सारख्याच प्रमाणात विखुरलेली नाहीत असे शासनाच्या लक्षात आले आहे. अनुज्ञप्त्यांची ठिकाणी काही विशिष्ट मार्गदर्शक तत्वानुसार बदलून देण्याच्या मागणीत भर पडल्यानेही ही बाब प्रकर्षाने जाणवली. परिणामतः हातभट्टीच्या अवैध दारूस आळा घालण्याचे मुळ धोरण [illegible] निष्फळ होत चालल्याचे दिसून येते. ही परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने राज्यात देशी मद्य किरकोळ विक्रीच्या नव्या अनुज्ञप्त्या देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. वर्धा जिल्ह्यात मात्र कोणत्याही बदलाशिवाय सध्याचेच धोरण चालू राहील. जनजाती क्षेत्रात ( tribal area ) अनुज्ञप्त्या न देण्याचे सध्याचे धोरण शासन अधिसूचना, गृह विभाग, क्रमांक बीपीए.०८७६/-१/१८३६-पीआरओ-३, दिनांक १४.१.८१ अन्वये घोषित केलेल्या क्षेत्रापुरते मर्यादित राहील. महाराष्ट्र-गुजराथ राज्याच्या सरहद्दीवरील कोरड्या पट्ट्यातही अनुज्ञप्त्या न देण्याच्या धोरणात काहीही बदल करण्यात आलेला नाही. वर उल्लेख केलेल्या शासन अधिसूचनेव्दारे घोषीत केलेले जनजाती क्षेत्र, वर्धा जिल्हा व महाराष्ट्र-गुजराथ राज्याच्या सरहद्दीवरील कोरडा पट्टा हे भाग वगळता आता पुढे दिलेल्या मार्गदर्शक तत्वाच्या आधारे राज्यात इतरत्र नवीन देशी दारू किरकोळ विक्रीच्या नव्या अनुज्ञप्त्या मंजूर करता येतू शकतील. या निर्णयास अनुसरून महाराष्ट्र देशी दारू नियमावली, १९७३ मध्ये शासन अधिसूचना क्र. बी.पी.ए.१०८९/व्ही/पीआरओ-२, दिनांक १७.२.८९ नुसार आवश्यक बदल करण्यात आले आहेत.

२. या धोरणाच्या कारवाईचे पहिले पाऊल म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी नवीन मंजूर करावयाच्या दुकानांची ठिकाणे व त्यांचा ठरविण्याकरिता सध्या कार्यरत

असलेल्या दुकानांच्या १०० टक्के अधिक दुकाने देता येऊ शकतील असे गृहीत धरावे. या आधारावर प्रथम जिल्ह्यातील एकूण नवीन धावयाच्या दुकानांची संख्या निश्चित करावी. नवीन दुकानांची ठिकाणे अंतिमरित्या निश्चित केल्यानंतर एकूण संख्या, जिल्ह्यातील सध्याच्या कार्यरत दुकानांच्या संख्येच्या १०० टक्के पेक्षा कमी होत असल्यास ही बाब आयुक्त, दारुबंदी व उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या निदर्शनास आणावी व आयुक्तांनी त्यांच्या स्तरावर प्रस्तावावर निर्णय घ्यावा. मात्र एखाद्या जिल्ह्यात वर निर्देशित केलेल्या संख्येपेक्षा अधिक दुकाने देणे आवश्यक आहे असे जिल्हाधिकाऱ्यांना वाटल्यास शासनाच्या पूर्व मंजुरीशिवाय तसे करता येणार नाही.

३. शासनाने नवीन अनुज्ञप्त्या देण्याचे धोरण ठरविले असल्याने सी.एल.३ अनुज्ञप्त्यांच्या पुनःस्थापनेबाबतच्या सर्व प्रलंबित प्रकरणांवर आता कारवाई करण्यात येणार नाही. जाहिरनामा प्रसिध्द झाल्यानंतर नवीन दुकानासाठी अर्ज करण्यास त्यांना मुभा राहील असे महाराष्ट्र देशी दारु नियमावली-१९७३ च्या नियम क्रमांक २३-अ नुसार नेमलेल्या समितीच्या सदस्य सचिवांनी तात्काळ संबंधितांना कळवावे. तसेच नवीन दुकाने देण्यात येत असल्याने सध्याची दुकाने एका ठिकाणाहून दुसरीकडे हलविणे योग्य होणार नाही. म्हणून अनुज्ञप्ती स्थलांतराची सर्व प्रलंबित प्रकरणे रद्द करुन संबंधित अर्जदारांना महाराष्ट्र देशी दारु नियमावली १९७३ च्या नियम क्र. २३-अ नुसार नेमलेल्या समितीच्या सदस्य सचिवांनी तसे तात्काळ कळवावे.

४. शासनाने असाही निर्णय घेतला आहे की, नवीन दुकानांची ठिकाणे ठरविणे, त्याकरिता अर्ज मागविणे व त्यावर कारवाई करणे आणि अंतिमतः अनुज्ञप्त्या मंजुरीसाठी अधिकारांचे विकेंद्रीकरण करुन जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात यावी. त्या अनुषंगाने महाराष्ट्र देशी दारु नियमावली १९७३ मध्ये उचित दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. नियमातील दुरुस्तीप्रमाणे समितीची रचना पुढीलप्रमाणे आहे :-

अ) बृहन्मुंबई :- १) जिल्हाधिकारी — अध्यक्ष

२) पोलिस आयुक्त किंवा पोलिस उपआयुक्त किंवा त्यापेक्षा वरचे पद धारण करणारे पोलिस आयुक्तांचे प्रतिनिधी. — सदस्य

३) महापालिका आयुक्त किंवा महापालिका उपआयुक्त किंवा त्यापेक्षा वरचे पद धारण करणारे महापालिका आयुक्तांचे प्रतिनिधी — सदस्य

४) अधीक्षक, दारुबंदी व उत्पादन शुल्क, मुंबई (शहर) व (उपनगरे) — सदस्य सचिव

ब) मुंबई व्यतिरिक्त इतर जिल्हे :-

| | |
|---|---|
| १) जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २) (अ) ज्या जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी पोलिस आयुक्तांचे कार्यालय आहे त्याठिकाणी पोलिस आयुक्तांच्या कार्यक्षेत्राकरिता पोलिस आयुक्त किंवा पोलिस उपायुक्त किंवा त्यापेक्षा वरचे पद धारण करणाने पोलिस आयुक्ताचे प्रतिनिधी. | सदस्य |
| (ब) पोलिस आयुक्तांच्या परिक्षेत्राबाहेरील कार्यक्षेत्राकरिता जिल्हा पोलिस अधीक्षक किंवा | सदस्य |
| (क) उपरोक्त "अ" व्यतिरिक्त जिल्ह्याकरिता जिल्हा पोलिस अधिक्षक. | सदस्य |
| ३) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद | सदस्य |
| ४) अधीक्षक, दारूबंदी व उत्पादन शुल्क | सदस्य सचिव |

टीप:- सर्व बैठकांना सदस्यांनी स्वत: हजर रहावयाचे असून त्यांना कोणत्याही परिस्थितीत प्रतिनिधी पाठविता येणार नाहीत. पोलिस आयुक्तांना अथवा महापालिका आयुक्तांना आपला प्रतिनिधी सदस्य म्हणून नेमावयाचा असेल तर त्या प्रतिनिधीचे नाव त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना कळवावे. पोलिस आयुक्त वा महापालिका आयुक्त ~~वा महापालिका आयुक्त~~ अन्य प्रतिनिधीचे नाव कळवीपर्यंत सदर प्रतिनिधी सदस्य म्हणून काम पाहील.

५. महत्वाचे म्हणजे दुकानांची ठिकाणे निश्चित करणे, अर्जांवर कारवाई करणे आणि अनुज्ञप्ती मंजूरीसाठी पात्र व्यक्तींची निवड करणे ही कामे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समिती करेल. मात्र समितीच्या अंतिम निर्णयानंतर अनुज्ञप्ती मंजूरीची कारवाई सध्याच्या पध्दती प्रमाणे जिल्हाधिकारी करतील.

६. या उपक्रमातील पहिली महत्वाची पायरी म्हणजे वर परिच्छेद २ मध्ये उल्लेख केलेल्या दुकानांच्या संख्येच्या मर्यादित राहून दुकानांची ठिकाणे निश्चीत करणे ही होय. पुढील बाबींच्या आधारे दुकानांची ठिकाणे ठरविण्यात यावीत:

अ) हातभट्टीवर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिकृत किरकोळ विक्रीची दुकाने उपलब्ध करून देणे.

ब) आर्थिक दृष्ट्या दुकान किफायतशीर राहील हे पहाणे.

क) या आवश्यक बाबीप्रमाणेच साधारणपणे पुढे दर्शविल्याप्रमाणे लोकसंख्येचा निकष विचारात घ्यावा:-

१) १०,००० किंवा त्यापेक्षा कमी लोकवस्तीच्या गावाकरिता – देशी मद्य विक्रीचे एक दुकान.

| | |
|---|---|
| २) १०,००० पेक्षा जास्त व २ लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहराकरिता | — १०,००० लोकसंख्येसाठी एक दुकान याप्रमाणात. |
| ३) २ लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेले शहर | — २०,००० लोकसंख्येकरिता एक दुकान याप्रमाणे. |

टिप :- १९८१ जनगणनेप्रमाणे घोषित केलेली लोकसंख्या आधारभूत धरण्यात यावी.

७. या व्यतिरिक्त नवीन दुकानांची ठिकाणे ठरवितांना पुढील बाबीही विचारात घ्याव्यात :-

१) शहरात नवीन दुकाने उघडतांना वार्ड किंवा तत्सम बंधने विहीत करण्यात येऊ नयेत.

२) नवीन दुकानाकरिता गावांचा समुह ठरविता येऊ शकेल व अर्जदार, समुहापैकी कोणत्याही गावी दुकान उघडण्यात अर्ज देऊ शकतील.

३) गावांची निवड करतांना बाजाराची गावे व मोठी गावे यांना प्राधान्य देण्यात यावे.

४) दुकानांची ठिकाणे निवडण्याच्या कार्यवाहीमध्ये पोलिस अधिकाऱ्यांचा सक्रिय सहभाग राहणार असल्याने नवीन दुकानामुळे " कायदा व सुव्यवस्थेचे " प्रश्न निर्माण होणार नाहीत याचीही दक्षता घेण्यात यावी. ज्या भागात/ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून दुकाने दिली जाणार नाहीत असे समिती ठरविल, अशा भागांची/ठिकाणांची यादी जाहिरनाम्यासोबत जोडण्यात यावी.

८. वरीलप्रमाणे दुकानांची संख्या व ठिकाणे निश्चित झाल्यावर सोबत जोडलेल्या नमुन्यात, आवश्यकतेनुसार त्यात बदल करुन, जाहिरनामा प्रसिध्द करुन नवीन दुकानांसाठी विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात यावेत.

९. <u>अर्ज करण्यासाठी पात्रता :-</u>

१) अर्जदार व अर्ज भागिदारीत असल्यास सर्व भागीदार महाराष्ट्राचे अधिवासी ( Domicile ) असणे आवश्यक आहे.

२) अर्जदार रु. १५,०००/- एवढ्या रकमेसाठी ऐपतदार असावा. भागीदार असल्यास कोणत्याही एका भागीदाराचे ऐपतीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरावे.

३) जे अर्जदार किंवा त्यांचे कुटुंबिय शासन आदेश, गृह विभाग, क्रमांक डीएनएल.०८७९/४१७८/१८६-पीआरओ-१, दि. ९.१.८० अन्वये घोषित केलेल्या अनुसूचित अनुज्ञप्त्यापैकी नमुना सी.एल. ३ अनुज्ञप्ती धारण करीत

......५.

असतील ते अनुज्ञप्तीधारक, मुंबई उच्च न्यायालयाच्या दावा क्र. २७४/१९८१ च्या निकालाअन्वये एकापेक्षा अधिक सी. एल. ३ अनुज्ञप्त्या धारण करण्यास पात्र आहेत. उच्च न्यायालयाच्या या निकालाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल केला असून सध्या सी. एल. ३/एफ. एल. २ अनुज्ञप्ती धारण करणाऱ्या व्यक्तीस नवीन सी. एल. ३ अनुज्ञप्ती मंजूर झाल्यास, त्या व्यक्तीवर सर्वोच्च न्यायालयाचा निकाल बंधनकारक राहील. अशा अनुज्ञप्तीधारकांना नवीन अनुज्ञप्ती मंजूर करतांना व न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत त्या अनुज्ञप्त्यांचे नुतनीकरण करतांना दरवेळी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील, असे प्रतिज्ञा पत्र घेण्यात यावे.

उच्च न्यायालयाच्या उपरोक्त निकालाप्रमाणे सी. एल. ३ अनुज्ञप्ती व्यतिरिक्त इतर अनुसूचित अनुज्ञप्ती धारण करणारी व्यक्ती नवीन सी. एल. ३ अनुज्ञप्ती धारण करण्यास अपात्र आहे. जाहिरातीत या अटीचा उल्लेख न चुकता करावा.

१०. अर्ज स्वीकारण्याची पद्धत :-

१) अर्ज फक्त अधीक्षक, दारुबंदी व उत्पादन शुल्क यांच्या कार्यालयात कामाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.३० पर्यंत स्विकारण्यात यावेत. अर्ज प्रत्यक्ष प्रतिनिधी मार्फत किंवा पोष्टाने पाठविता येतील. प्रत्यक्ष आलेल्या अर्जदारांना अर्जाची पोच लगेच देण्याची सोय करावी. पोच देतांना त्यावर अर्जाचा अनुक्रमांक व त्यासोबत प्राप्त झालेल्या कागदपत्रांचा उल्लेख असावा. (पोच पावतीचा नमुना सोबत जोडण्यात आला आहे.)

२) प्राप्त झालेल्या अर्जांची नोंद करण्यासाठी स्वतंत्र नोंदवही उघडण्यात यावी. नोंदवहीवर अधीक्षकांच्या कार्यालयाचे सील उमटवून प्रत्येक पृष्ठावर पृष्ठ क्रमांक लिहून नोंदवहीत एकूण किती पृष्ठे आहेत याचा दाखला अधीक्षकांनी स्वतः च्या स्वाक्षरीखाली नोंदवहीच्या शेवटच्या पानावर सुरुवातीसच द्यावा.

३) प्राप्त झालेल्या अर्जांची नोंद वरीलप्रमाणे स्वतंत्रपणे उघडलेल्या नोंदवहीत क्रमानुसार घेण्यात यावी व नोंदवहीतील अनुक्रमांक हाच पोच पावतीवरील क्रमांक देण्यात यावा. (नोंदवहीतील रकाने दर्शविणारा नमुना सोबत जोडला आहे).

४) पोष्टाने प्राप्त झालेल्या अर्जांची नोंद वरील स्तंभ २ प्रमाणे नोंदवहीत करुन अर्जाची पोच पोष्टाने ज्या दिवशी अर्ज प्राप्त झाला त्याच दिवशी व उशिरात उशिरा कामाच्या पुढील दिवशी नोंदणी (Registered) पोष्टाने पाठविण्यात यावी.

....६

५) मुदतीत प्राप्त झालेला प्रत्येक अर्ज स्वीकारला पाहिजे.

६) एका व्यक्तीस एका किंवा एकापेक्षा जास्त दुकानासाठी प्रत्येकी वेगवेगळा अर्ज करता येऊ शकेल. मात्र प्रत्येक अर्जासोबत स्वतंत्र अर्ज शुल्क भरणे आवश्यक राहील.

अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी अर्ज स्विकारण्याची वेळ संपल्यानंतर अधिक्षकांनी एकूण किती अर्ज प्राप्त झाले याबाबतचा शेरा शेवटच्या अर्जदाराच्या नोंदीखाली स्वतः नोंदवावा व एकूण अर्जांची संख्या आयुक्तांना तारेने त्याच दिवशी कळवावी. हा दाखला नोंदवितांना अधीक्षकांनी अर्जांचे अनुक्रमांक बरोबर नोंदविले आहेत, तसेच कोणताहि क्रमांक कोरा सोडलेला नाही वा दोनदा लिहिलेला नाही व अभिप्रायानंतर कोणत्याही अर्जाची नोंद करता येऊ शकणार नाही याची दक्षता घ्यावयाची असून तसा स्पष्ट उल्लेख दाखल्यात करावयाचा आहे.

११. <u>प्राप्त झालेल्या अर्जांवरील कारवाई :–</u>

प्राप्त झालेल्या अर्जांचे प्रथम दुकानावार वेगवेगळे गठ्ठे करण्यात यावेत व सोबत दिलेल्या तक्त्यात त्यांची माहिती भरण्यात यावी. प्रत्येक दुकानाकरिता स्वतंत्र तक्ता करण्यात यावा. समितीने प्राप्त अर्जांची पुढील बाबींच्या आधारे छाननी करून आधी अपात्र अर्जदारांची यादी तयार करावी :–

१) ज्या अर्जदारांना मुंबई दारूबंदी कायदा, १९४९ चे कलम ५४ (१) (डी) मध्ये उल्लेख केलेल्या कायद्याखाली शिक्षा झाली असेल.

२) ज्या अर्जदारांची अनुज्ञप्ती पूर्वी अनुज्ञप्तीची अट किंवा नियमाचा भंग यामुळे रद्द करण्यात आली असेल.

३) जे अर्जदार अबकारी, विक्रीकर व आयकराचे थकबाकीदार असतील.

४) ज्या ठिकाणी दुकान उघडण्याचे प्रयोजित केले नाही अशा ठिकाणाकरिता प्राप्त झालेले अर्ज.

५) अपुऱ्या कागदपत्रांसोबत प्राप्त झालेले अर्ज ( <u>छाननी दिनांकापर्यंत अर्जाच्या सोबत सादर करावयाची कागदपत्रे सादर करावयाची मुभा देण्यात यावी</u>).

६) ज्या अर्जदारांनी खोटी माहिती सादर केली आहे असे अर्ज.

७) विहित वेळेनंतर प्राप्त झालेले अर्ज.

८) अर्जाच्या शुल्काशिवाय प्राप्त झालेले अर्ज.

१२. अशा प्रकारे अपात्र समजण्यात आलेल्या अर्जदारांची यादी कमिटीने अंतिमरित्या मंजूर करून अधीक्षक, दारूबंदी व उत्पादन शुल्क यांच्या तसेच त्यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांच्या/कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर जाहिरनाम्यामध्ये दर्शविलेल्या ठिकाणी लावणे.

.....७

आवश्यक आहे. जे अर्जदार वरील प्रमाणे अपात्र समजण्यात येतील त्या अर्जदारांना नोटीस लावल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांपर्यंत उपरोक्त कमिटीकडे प्रतिवेदन करण्याची मुभा राहील. प्रतिवेदनाचा विचार करून अर्जावर समिती " समरिली " ( Summarily. ) निकाल देईल.

१३. पात्र अर्जदारांमधून अनुज्ञप्ती मंजूरीसाठी निवड करण्याची पध्दती :—

शासनाने असेही ठरविले आहे की, पात्र अर्जदारांपैकी अनुज्ञप्ती मंजूरीसाठी निवड जाहिररित्या सोडत पध्दतीने करावी. सोडत जिल्हा मुख्यालय व जिल्ह्यातील अन्य प्रमुख शहरी ठेवता येऊ शकेल. मात्र जाहिरनाम्यात प्रत्येक सोडतीचा दिवस, ठिकाण, वेळ व ज्या दुकानाची सोडत होणार आहे ती ठिकाणे स्पष्टपणे नमुद करणे आवश्यक आहे. सर्व सोडतीस समितीचे सर्व सदस्य पूर्णवेळ व्यक्तीशः उपस्थित राहतील. तसेच अर्जदार व/किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील.

सोडतीची पध्दत साधारणपणे पुढीलप्रमाणे राहील:—

अ) ज्या ठिकाणी एकाच दुकानाकरिता अर्ज मागविण्यात आले असतील तेथे अवलंबिण्याची पध्दती.

१) प्रत्येक दुकानाच्या सर्व पात्र अर्जदारांच्या संपूर्ण नावांच्या एकाच रंगाच्या शाईने मराठीतून वाचण्यास योग्य अशा हस्ताक्षरात प्रत्येकी फक्त एक चिठ्ठी लिहावी. नाव लिहिण्यास चूक झाल्यास, खाडाखोड करून दुरूस्ती केलेली चिठ्ठी न वापरता पुन्हा दुसरी चिठ्ठी लिहावी.

२) प्रत्येक चिठ्ठीकरिता एकाच आकाराचा व एकाच रंगाचा कागद वापरण्यात यावा व चिठ्ठीवर सदस्य सचिवांच्या कार्यालयाचे "सील " उमटवण्यात यावे.

३) अर्जदाराचे नांव लिहीलेली बाजू झाकली जाईल अशा रितीने प्रत्येक चिठ्ठीची घडी एकसारखी करण्यात यावी. चिठ्ठीची घडी व्हेजा सहजी उघडली जाणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे चिठ्ठीची घडी केल्यानंतर चिठ्ठीवरील नांव वा त्यातील एखादे अक्षर ओळखता येणार नाही याची दक्षता घ्यावी, ( कागद पुरेसा जाड असावा, घडी नीट करावी ).

४) प्रत्येक दुकानाकरिता पात्र ठरलेल्या सर्व अर्जदारांची प्रत्येकी एक प्रमाणे सर्व चिठ्ठ्या एका झाकण उघडे असणाऱ्या काच/प्लॅस्टिकच्या बरणीत/डब्यात तवासमक्ष मोजून टाकण्यात याव्यात. ( चिठ्ठ्या बाहेरून सहजा सहजी दिसतील अशा काचेचा/प्लॅस्टिकचा रंग असावा ).

५) झाकण बंद करून [illegible] [illegible] पाहावी की

जेणेकरून आतील चिठ्ठ्या वरखाली होतील (Shuffling ).

६) उपस्थित प्रेक्षकातील प्रत्येक वेळी शक्य तो वेगळ्या प्रेक्षकास बोलावून झाकण खोलून एक चिठ्ठी उचलण्याची विनंती करावी किंवा डोळ्यावर पट्टी बांधून चिठ्ठी उचलण्यास सांगावे.

७) अशारितीने उचललेल्या चिठ्ठीवरील नाव शक्यतो त्याच प्रेक्षकास वाचून दाखविण्याची विनंती करावी.

८) नंतर ती चिठ्ठी दुसऱ्या प्रेक्षकास दाखवून वाचण्याची विनंती करावी.

९) निवड केलेल्या चिठ्ठीच्या ज्या बाजूवर अर्जदाराचे नांव लिहिले असेल त्याच्या उलट बाजूवर समितीच्या सर्व सदस्यांच्या सह्या घ्याव्यात.

ब) एका ठिकाणी/गांवी/शहरात एकापेक्षा अधिक दुकाने देतांना अवलंबावयाची पध्दती:-

ज्या गावी/शहरी एकापेक्षा अधिक नविन दुकाने उघडण्याचे ठरविले असेल त्या गावाकरिता प्राप्त झालेल्या सर्व पात्र अर्जाचा " लॉट " एकत्र टाकण्यात यावा व एकावेळी एक चिठ्ठी उचलून स्तंभ ६ ते ९ मधील पध्दतीनुसार दुकानांच्या संख्येइतक्या चिठ्ठ्या निवडाव्या.

१४. वरील पध्दतीचा अवलंब करून प्रत्येक दुकानासाठी फक्त एका अर्जदाराची निवड करावी. कोणत्याही परिस्थितीत प्रतिक्षायादी तयार करण्यात येऊ नये. काही कारणामुळे निवड झालेला अर्जदार अनुज्ञप्ती मंजूरीसाठी आवश्यक असणाऱ्या बाबींची पूर्तता विहीत कालावधीत करू न शकल्यास त्याची निवड रद्द समजण्यात येईल याची स्पष्ट जाणीव सदस्य सचिवांनी निवड झालेल्या अर्जदारास लेखी देऊन त्याची पोच घ्यावी. अशा परिस्थितीत पुन्हा निवड करण्याची आवश्यकता असल्यास वरील सोडतीच्या पध्दतीप्रमाणे उर्वरित पात्र अर्जदारांमधून दुसऱ्या अर्जदाराची निवड करण्यात यावी.

१५. चिठ्ठ्यांची सुरक्षितता :

१) सर्व दुकानांच्या यशस्वी अर्जदारांच्या चिठ्ठ्या किमान एक वर्ष सिलबंद ठेवण्यात याव्यात.

२) अयशस्वी अर्जदारांच्या नावाच्या चिठ्ठ्या सिलबंद करून किमान एक वर्ष राखून ठेवाव्यात.

......९

१६. निवड समितीच्या सर्व बैठकींची इतिवृत्ते सदस्य सचिवांनी तयार करून ती अध्यक्षांच्या सहीने सर्व सदस्यांना वेळच्या वेळी पाठवावयाची आहेत. सी.एल.-३ अनुज्ञप्ती पुनःस्थापनेची प्रकरणे यापुढे पूर्णपणे बंद करण्यांत आली आहेत. जिल्हाधिका-यांनी त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या पुनःस्थापनेच्या प्रकरणांतील अर्जदारांना शासनाचा उपरोक्त निर्णय कळवून ते नविन अनुज्ञप्तीसाठी अर्ज करू शकतील असेही कळविण्यात यावे. तसेच शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत सध्याच्या अनुज्ञप्तींची ठिकाणे बदलण्याबाबतचे अर्ज विचारांत घेतले जाणार नाहीत. शासनाकडे व आयुक्तांकडे प्रलंबित असलेले उपरोक्त दोन्हीही विषयावरील अर्ज जिल्हाधिका-यांना परत करण्यात येत आहेत. जिल्हाधिका-यांनी त्यांच्याकडील व परत प्राप्त झालेल्या अर्जावर वरील-प्रमाणे कारवाई करावी.

१७. <u>अनुज्ञप्ती मंजूरीची कार्यवाही</u> :-

सोडत पध्दतीने निवड झालेल्या अर्जदारांना सदस्य सचिवांनी त्यांची अनुज्ञप्ती देण्यात निवड झाल्याचे निवडीच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आंत लेखी कळवून अर्जदाराकडून निवड स्विकारण्यात आल्याचे पत्र व विहित कालावधीत अनुज्ञप्ती मंजूरी-साठी आवश्यक ती पूर्तता करण्याचे लेखी हमीपत्र घ्यावे. निवड झाल्याचे अर्जदाराला कळविताना स्पष्टपणे नमुद करावे की त्यांच्या पूर्व चारित्र्याचा पोलिस अहवाल प्रतिकूल आढळल्यास निवड रद्द समजण्यात येईल. विहित कालावधीत लेखी हमीपत्र प्राप्त न झाल्यास किंवा हमीपत्र सादर करूनही इतर पुर्तता विहित कालावधीत पूर्ण न झाल्यास सदस्य सचिवांनी अशा अर्जदारांची यादी निवड समितीस सादर करावी. नियमातील तरतूदीप्रमाणे निवड झालेल्या अर्जदाराने अनुज्ञप्ती मंजूरीसाठी आवश्यक ती पूर्तता निवड झाल्याचे कळविल्यापासून तीन महिन्याचे आंत पूर्ण करणे आवश्यक आहे. याबाबत खुलासा करण्यात येतो की, निवड झालेल्या अर्जदाराने त्याच्या अखत्यारीतील करावयाची कारवाई उपरोक्त कालावधीत पूर्ण करावयाची आहे. अर्जदारांच्या अवाक्या बाहेरील कारणांमुळे जर अशी पूर्तता करता येवू शकली नाही असे समितीस पटल्यास समितीने मुदतवाढ द्यावी. निवड समिती या अर्जदारांची पडताळणी करून त्यांना पुर्तता करण्यासाठी मुदतवाढ द्यावी किंवा कसे हे ठरवतील व ज्या प्रकरणात मुदतवाढ देण्यात येणार नाही, अशा ठिकाणी उर्वरित पात्र अर्जदारांमधून दुस-या अर्जदाराची निवड वरील पध्दतीने पुन्हा करण्यात यावी.

१८. निवड झालेल्या अर्जदाराचे पूर्व चारित्र्य पडताळणीसाठी सदस्य सचिवांनी सोड-तीच्या दिनांकापासून एक आठवड्याचे आंत पोलिस विभागास पत्र लिहिणे आवश्यक आहे.

१९. पोलिस विभागाने सर्व निवड झालेल्या अर्जदारांची चारित्र्य पडताळणी जास्तीत जास्त एक महिन्याच्या आंत पूर्ण करुन त्याचा अहवाल सदस्य सचिवांना पाठविणे आवश्यक आहे. उपरोक्त मुदतीत अहवाल प्राप्त न झाल्यास संबंधीत अर्जदाराचे चारित्र्य अनुज्ञप्ती मंजूरीत आक्षेपार्ह नाही असे गृहित धरुन जिल्हाधिकारी अनुज्ञप्ती मंजूर करु शकतील.

२०. अर्जदारांनी दुकानासाठी नियोजित केलेली जागा नियमातील तरतुदीनुसार तसेच शासनांनी व आयुक्तांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटीप्रमाणे आहे किंवा नाही याची पडताळणी निरीक्षक व त्यावरील अधिका-याकडून व काही अडचणीच्या वेळी अनुभवी दुय्यम निरीक्षकांकडूनही करुन घेण्यात यावी व अनुज्ञप्ती मंजूरीची कारवाई समितीने ठरवून दिलेल्या कालावधीत पूर्ण करण्यात यावी. मात्र जागा मंजूरीची जी प्रकरणे निरीक्षक किंवा दुय्यम निरीक्षक यांच्याकडून नाकारण्यात येतील त्या सर्व प्रकरणांची अधीक्षक/उपअधिक्षक यांनी पुनःपडताळणी करणे आवश्यक आहे. तसेच अधीक्षकांनी स्वतंत्ररित्या किमान १० टक्के जागांची पडताळणी स्वतः करावी.

२१. <u>सर्व साधारण :-</u>

१) एखाद्या दुकानासाठी एकही अर्ज प्राप्त न झाल्यास किंवा प्राप्त झालेले अर्ज निवड समितीने अपात्र ठरविल्यास या दुकानाकरिता फेरअर्ज मागविणे किंवा ते दुकान दुस-या गावी/ठिकाणी नियोजित करुन फेर अर्ज मागविणे किंवा ते दुकान देण्याचे रहित करणे याबाबतचे निर्णय समिती घेईल व दुकान न देण्याचा निर्णय घेतल्यास त्याचा अहवाल सदस्य सचिव आयुक्तांना सादर करतील.

२) वरील सर्व प्रक्रिया समयबध्द कार्यक्रम आखून पूर्ण करावयाची असून आयुक्त, दारुबंदी व उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे या योजनेचे नियंत्रक म्हणून काम पहातील.

२२. हातभट्टीच्या दारुवर नियंत्रण ठेवणे याउद्देशाने शासनाने उपरोक्त धोरणात्मक निर्णय घेतला आहे याची जाणीव जिल्हाधिका-यांना आहे. हा धोरणात्मक निर्णय समयबध्द कालावधीत राबवावयाचा आहे. म्हणून हे परिपत्रक निर्गमित झाल्यापासून ४ महिन्यांच्या आत नविन अनुज्ञप्त्या देण्यात येतील अशी अपेक्षा आहे. अर्ज मागविणे, अर्जाची छाननी करणे, अर्जदारांची निवड करणे व अनुज्ञप्ती मंजूर करणे ही कामे कोणत्याही तक्रारी न येता वा शंका निर्माण होईल अशी परिस्थिती

निर्माणच होणार नाही अशा रितीने योग्य व भेदभावरहित पध्दतीने करण्यात यावी. समितीची बैठक घेणे व कारवाई वेळेत पूर्ण करणे यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व कामात स्वतः लक्ष घालावे अशी शासनाची अपेक्षा आहे.

या परिपत्रकाची प्रत समितीच्या सदस्यांनी द्यावयाची आहे.

(स. कृ. जावडेकर)
उपसचिव
गृह विभाग, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई.